
# बुद्ध तत्त्वज्ञान
## (Buddhist Philosophy)

संपादक
डॉ. पंजाब चव्हाण
प्रा. रामचंद्र भिसे
प्रा. हनुमंत जवळगे



४४. बुद्ध तत्त्वज्ञान व भारतीय समाज
प्रा. संदीप गोरे , प्रा. उत्तमराव कावळे/३०८
४५. बौद्ध धम्मातील नैतिकता आणि भारतीय समाज
प्रा. डी.के. कदम /३१२
४६. बौद्ध धर्माच्या प्रचार व प्रसारामध्ये नागवंशीयांचे योगदान : एक अभ्यास
प्रा. पवार व्ही. एस , प्रा. हटकर एस.पी , डॉ. धबडगे एस./३१६
४७. बौद्ध तत्त्वज्ञान आणि भारतीय समाज
प्रा. डॉ. आश्रु जाधव/३२२
४८. मराठवाड्यातील नवबौद्धांवरील अत्याचार
प्रशांत धो. घोडवाडीकर/३२८
४९. बौद्ध तत्त्वज्ञान आणि भारतीय समाजव्यवस्था
प्रा. सचिन रमेश साळवे/३३६
५०. बौद्ध तत्त्वज्ञान आणि भारतीय समाज
प्रा. ससाणे सतीश गंगाराम/३४५
५१. भारतीय समाजव्यवस्थेत बौद्ध तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता
प्रा. मधुकर ठोंबरे / प्रा. संतोष कोल्हे/३५२
५२ बौद्ध धम्म आणि भारतातील नवबौद्धांची सद्य:स्थिती
प्रा. डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे / प्रा. सुनीलचंद्र सोनकांबळे/३५९
५३. बुद्ध तत्त्वज्ञान आणि भारतीय समाज
प्रा.भगवान माधवराव लोखंडे/३७३
५४. भारतातील बुध्द धम्म व नवबौध्दांची सद्यस्थिती
प्रा. भारत पगारे/३७९
५५. बौध्द कालीन शिक्षण पद्धती व आधुनिक शिक्षण पध्दती एक तुलनात्मक अध्ययन
प्रा. सौ. सोमवंशी अल्का बाबाराव/३९४
५६. बौद्ध धम्म आणि भारतातील नवबौद्धांची समर्पकता
हर्षवर्धन किशनराव दवणे , प्रा. राजरत्न किशनराव दवणे /४०२
५७. बौध्द शिक्षण प्रणालीतील मानवतावाद
डॉ. गोणारकर एस.एन. , प्रा. राजेंद्र गोणारकर, /४०८

# बौद्ध धम्मातील नैतिकता आणि भारतीय समाज

**प्रा. डी.के. कदम**
हु.ज.पा. महाविद्यालय, हिमायतनगर

बौद्ध धम्म प्रामुख्याने नैतिक आचरणावर आधारलेला आहे. भगवान गौतम बुद्धांनी धम्माच्या माध्यमातून २५०० वर्षांपूर्वी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची आज समाजाला आवश्यकता आहे. धम्म हा प्रामुख्याने त्रिशरण, चार आर्य सत्य, पंचशील, अष्टांग मार्ग व पारमिता यावर आधारित आहे.

भगवान गौतम बुद्धांनी मानवी समाजाकडे दोन दृष्टिकोनातून बघितले. प्रबुद्ध आणि अप्रबुद्ध. त्यांनी प्रबुद्ध समाजाच्या निर्मितीची आवश्यकता सांगितली. बुद्धांच्या मते, अप्रबुद्ध व्यक्ती अज्ञानी, स्वार्थी, संकुचित मनोवृत्ती, अपराधी वृत्तीच्या असतात. या अज्ञानी, स्वार्थी व्यक्ती फक्त स्वतःच्या सुखसोईकडे लक्ष देतात. त्या स्वार्थी अनैतिक व प्रसंगी क्रूर मार्गाने काहीही मिळविण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्याच्या दुःखावर आपली सुखे उभी करतात. समाजात सर्वत्र दुःख पसरवितात. समाजात अशा अप्रबुद्ध माणसाची संख्या जास्त वाढली तर तो समाज कसा दुःखी असेल याची कल्पना करणे कठीण आहे. म्हणून गौतम बुद्धांनी प्रबुद्ध समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रबुद्ध मानवाची आवश्यकता होती. प्रबुद्धता हा त्या धम्माचा आधार आहे. प्रबुद्ध मानव बुद्धिमान व शहाणे असतात. ती दुसऱ्यांच्या सुखात आपले सुख शोधतात. सर्वत्र सुख, शांतता, समन्वय, नैतिकता व करूणा पसरविण्याचा प्रयत्न करतात. प्रबुद्ध मानव हा भोगवाद अनैतिकता या पासून दूर राहणारा असतो. जशी प्रज्ञा वाढेल तशी लोकांची नैतिकता वाढेल व त्यांचे जीवन परोपकारमय, करुणामय होईल. म्हणून बुद्धांची प्रबुद्धता हा त्या धम्माचा आधार असल्यामुळे सर्व प्रबुद्ध माणसांनी त्याचे पालन करावे व माणसातील विद्यमान प्रबुद्धता हाच त्या बुध्दांच्या नैतिकतेचा आधार व प्रेरक आहे. अनैतिकतेवर येणारा आंतरिक अंकुशसुद्धा आहे. भगवान गौतम बुद्धांच्या मते अप्रबुद्ध माणसे अज्ञानी, स्वार्थी आणि समाजात हट्टीपणे वागतात. प्रबुद्ध माणसाने स्वतःचे सुख, समृद्धी व प्रगती इतरांच्या संदर्भात शोधली पाहिजे. समाजातील सर्वांशी नम्रपणे वागले पाहिजे. प्रबुद्ध माणसे व्यापक दृष्टी, सम्यक दृष्टी ठेवून सामूहिक उत्थानाचा प्रयत्न करतात. त्यासाठी प्रबुद्ध माणसे समाजात

वाढविण्यासाठी बौद्ध धम्मप्रणित नैतिकतेची आवश्यकता आहे.

भारतीय समाजाचा विकास झपाट्याने होत असून या विकासाच्या प्रवाहाबरोबर समाजातील नैतिकतेचा ऱ्हास होत आहे. दिवसेंदिवस नैतिकता कमी होताना दिसते. नैतिकतेची जागा अनैतिकता घेत आहे. त्यासाठी लोकांमध्ये प्रज्ञा विकसित करणे आवश्यक आहे. समाजातील सर्व लोकांमध्ये ती शक्य नसली तरी समाजातील प्रतिष्ठित (राजधुरंधर) व्यक्तीमध्ये ती विकसित होणे आवश्यक आहे.

भगवान गौतम बुद्धांनी तीन प्रकारची तृष्णा सांगितली आहे. काम तृष्णा, भव तृष्णा व विभव तृष्णा परंतु आज व्यक्तीला संपत्ती बद्दलची व विलासी गोष्टींबद्दलची तृष्णा निर्माण झाली. संपत्तीबद्दलची तृष्णा समाजाला पतनाकडे नेत आहे व आज समाजात अप्रबुद्ध माणसांना भुलविणाऱ्या असंख्य गोष्टी घडत आहेत. त्यामुळे नवीन समस्या निर्माण होत आहेत. सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण, लोकसंख्या वाढ, बेरोजगारी, प्रदूषण, अणुयुद्धाचे संकट यामुळे मानवी जीवन निरस व निरर्थक होत आहे. दिवसेंदिवस व्यक्तीची संकुचित मनोवृत्ती, अपराधी बनत चालला आहे. यापासून मुक्तता मिळविण्यासाठी बौद्ध तत्त्वज्ञानाप्रमाणे मानवाने प्रबुद्ध होणे आवश्यक आहे. मानवी मनाला प्रबुद्ध केल्याने समाजात उत्तम मार्ग व उत्तम स्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढते. म्हणून प्रबुद्ध व्यक्तीने भरलेला प्रबुद्ध समाज निर्माण करणे आवश्यक आहे.

आज समाजातील अपराधी लोक बुद्धिमान असतात, काही हुशार असतात ते स्वार्थी असतात. समाजाला खड्ड्यात ढकलून ते स्वतःची भरभराट करतात. म्हणून राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. आज बुध्दीने दिलेल्या ज्ञानामुळे शहाणा माणूस अनैतिक कामे करणार नाही. प्रबुद्ध माणसाची दृष्टी व्यापक असते. तो शहाणा व समजुतदार असतो. म्हणून तो स्वतःच नैतिक मार्ग निवडेल त्यासाठी राजकीय क्षेत्रातील राजकीय नेत्यांना बौद्ध धम्मातील नैतिकतेची गरज आहे.

आज मानवी समाजाचा विकास होत आहे. मानवी दृष्टी व्यापक होत आहे. परस्परावलंबनसुद्धा वाढत आहे. नैतिकता मात्र कमी होत आहे. त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार वाढत आहे. धर्मश्रेष्ठी लोक अधिक जागरुक झाले आहेत. त्यांच्याकडे अफाट संपत्ती आहे. ते धर्माची शुद्धता व पवित्रता

ठेवण्याच्या प्रयत्नातच व्यस्त झाले आहे. तर माणसे धर्माच्या नावावर विभागली जात आहेत. जोपर्यंत मानवावर विभिन्न धर्माचे प्रभुत्व राहील तोपर्यंत समाजात समानता, बंधुता व शांतता अशक्य आहे. त्यासाठी समाजाची प्रगती करण्यासाठी धर्माची व्याप्ती वैयक्तिक जीवनापुरती मर्यादित ठेवावी लागेल व सार्वजनिक जीवनात बुद्धिप्रामाण्यवादी नैतिकताच महत्त्वाची आहे. बुद्धप्रणीत धम्माच्या वर्तमानकालीन संस्काराने (नैतिकतेने) हे सर्व नियंत्रीत होवू शकते.

सध्याची समाजाची अवस्था तृष्णेपोटी दु:खी व निराशावादी करणारी आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जोरावर मानवाने डोळे दिपवून टाकणारी प्रगती केली आहे, परंतु मानवी नैतिकता खालावलेली आहे. यंत्रांनी मानव पूर्वीपेक्षा जास्त बलवान व सक्षम बनविले आहे. निरनिराळ्या यंत्रामुळे मानव आत्मनिर्भर झाला आहे, परंतु एकीकडे तो एकलकोंडा, स्वार्थी व अपराधी मनोवृत्तीचा बनला आहे. समाजातील अप्रबुद्ध व दुष्ट लोक जास्त सक्षम झाले आहे. म्हणून आज मानवी समाजाला प्रज्ञा, शील व करुणेची म्हणजेच सर्वांशी सामंजस्याने राहण्याची आवश्यकता आहे. बुद्ध धम्म ही फक्त बुद्धिप्रामाण्यवादी नैतिकता आहे. ती एक प्रबुद्ध माणसाने इतर मानवासाठी व मानवहितार्थ सांगितलेली नैतिकता आहे. आज मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात प्रज्ञा, शील व करुणा या महत्त्वाच्या आहेत. समाजात प्रबुद्धतेचे, मैत्रीचे, परस्पर सामंजस्याचे, विश्वासाचे व शांततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी धम्मातील नैतिकता महत्त्वाची आहे. धम्म ही एक नवी नैतिकता आहे. बुद्धाचा अनात्मवाद हा भौतिक जगासाठी आहे. धर्मनिरपेक्ष व ती बुद्ध नावाच्या एका मनुष्याने सर्व मानवासाठी निर्माण केलेली नैतिकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जे महत्त्वाचे स्थान विविध धर्मामध्ये ईश्वराला दिले जाते तेच स्थान नैतिकतेला धम्मामध्ये दिले जाते. नैतिकतेचा उद्देश मानवाच्या जीवनातील दु:खाला दूर करणे हाच फक्त आहे. या नैतिकतेने समाज प्रबुद्ध बनला तर प्रबुद्ध समाजातील सामाजिक संस्था कोणत्याही व्यक्तींवर अन्याय करणार नाहीत. प्रत्येकाला त्यांच्या उपजत क्षमतांचा हवा तसा विकास करण्यासाठी पुरेशी संधी मिळेल व बुद्धांना समाजाला दु:ख मुक्त सामंजस्यपूर्ण प्रबुद्ध व प्रगतीशिल करावयाचे स्वप्न साकार होईल. असे जर झाल्यास बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे विश्वकल्याणाचे तत्त्व अस्तित्वात येईल.

नैतिकता ही प्रामुख्याने सामाजिक जीवनाशी संबंधित आहे. म्हणून

सामाजिक जीवनात नैतिकता मानवाला आपले सामाजिक कर्तव्य कोणते याची जाणीव करून देते. आपल्यावरील सामाजिक निर्बंध कोणते आहेत, याची जाणीव करुन देते. प्रत्येक मानवाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून जीवनव्यवहार केल्यास नीतिमान, सदाचारी समाज निर्माण होण्यास मदत होईल.

भगवान बुद्धांनी आपल्या धम्मात प्रज्ञा, शील, करुणा, आर्य सत्य, पंचशील, अष्टांग मार्ग, पारमिता हे मानवी कल्याणाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. भगवान बुद्धांनी या तत्त्वज्ञानाला अनुकरणाबाबत मी सांगतो ते प्रमाण मानून स्वीकारू नका. तुमच्या बुद्धीला प्रमाण वाटत असेल तर मी सांगितलेल्या मार्गाने जा. फक्त मी मार्गदाता आहे, असे भगवान बुद्धाचे बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वज्ञान, नैतिकतावादी तत्त्वज्ञान होते. म्हणून २५०० वर्षानंतर आजही जागतिकीकरणाच्या काळात, उत्तर अधुनिक काळात भारताला नव्हे, तर विश्वाला बुद्धिप्रामाण्यवादी, नैतिकतावादी तत्त्वज्ञानाची नितांत आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :-** आज समाजात अमानुषता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. निर्दयता बेफाम झालेली आहे. मानवी स्वार्थी बेबंध झाला आहे. जीवन माझा स्वार्थ, जीवन म्हणजे केवळ माझी सरशी, जीवन माझे सुख ते कोणत्याही मार्गाने मिळो अशा विकृत समजुतीच्या आगीत आजचे विश्व जळत आहे. माणसांना सुखी होण्यास स्वतःचे सुख पुरेशे नाही. सुखी होण्यासाठी माणसांना इतरांची दुःखे लागतात. म्हणून सुखाची कल्पना विकृत, विघातक आहे. या विकृतीतून, विघातकतेतून मुक्ती मिळवायची असेल तर बुद्धिप्रामाण्यवादी, नैतिक चारित्र्यसंपन्न मानव आज जगाला तारू शकतो.


| अ.क्र. | संदर्भग्रंथाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| ०१ | दीक्षासकाळ विशेषांक - २०११ संपादक | लेखक श्रीपाद विनायकराव अपराजित |
| ०२ | गौतम बुद्धांचा धम्म जगाला वाचवू | डॉ.डी.डी.बंदिष्टे शकेल. |
| ०३ | भारतीय समाजातील प्रमुख धर्म | प्रा.सौ.ज्योती डोईफोडे |
| ०४ | सर्वोत्तम भुमिपुत्र : गौतम बुद्ध | डॉ.आ.ह.साळुंके |
| ०५ | दि धम्मपद | धम्म ज्योती यु. |